सकाळ

# शेकटकर, आमटे यांना सूर्यदत्ता जीवनगौरव

**पुणे, ता. २९ :** सूर्यदत्ता एज्युकेशन फाउंडेशनच्या सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटतर्फे दिला जाणारा 'सूर्यदत्ता जीवनगौरव' पुरस्कार लेफ्टनंट जनरल (निवृत्त) डॉ. डी. बी. शेकटकर व डॉ. विकास आमटे यांना जाहीर झाला; तसेच विविध क्षेत्रांत उत्तम कार्य करणाऱ्या लायन द्वारका जालान, टोनींनो लॅम्बोर्गीनी, सुधा मल्होत्रा, डॉ. मकरंद जावडेकर, डॉ. कमल टावरी आदींनासुद्धा जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात येणार असल्याची माहिती इन्स्टिट्यूटचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय चोरडिया यांनी पत्रकार परिषदेत दिली. या वेळी संचालक अक्षित कुशल, रुचा जोशी, सचिन इटकर आदी उपस्थित होते.

डॉ. चोरडिया म्हणाले, ''फाउंडेशनच्या वर्धापन दिनानिमित्त हे पुरस्कार देण्यात येणार आहेत. हा पुरस्कार सोहळा ७ फेब्रुवारीला सायंकाळी पाच वाजता बावधन येथील सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या प्रांगणात होईल. शास्त्रीय संगीतासाठी सोमा घोष, शिक्षण व संशोधन क्षेत्रात राजेश बत्रा, गोपिका वर्मा यांना सूर्यदत्ता राष्ट्रीय पुरस्कार देण्यात येईल.''

Pune, Pune-Today
30/01/2020 Page No. 3

नवभारत

# 'सूर्यदत्ता इन्स्टिट्यूट्स' के राष्ट्रीय पुरस्कारों की घोषणा

## डॉ. शेकटकर, डॉ. विकास आमटे समेत कई कलाकार होंगे सम्मानित

संवाददाता

**पुणे.** सूर्यदत्ता एजुकेशन फाउंडेशन द्वारा संचालित सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स' की ओर से दिए जाने वाले 'सूर्यदत्ता जीवनगौरव पुरस्कारों' की घोषणा कर दी गई है. इस वर्ष लेफ्टि. जनरल (निवृत्त) डॉ. दत्तात्रय शेकटकर (राष्ट्रसेवा), डॉ. विकास आमटे (चिकित्सा सामाजिक सेवा), द्वारका जालान (साहित्य), टोनीनो लैम्बोर्गिनी (अंतरराष्ट्रीय उद्यमिता), पद्मश्री सुधा मल्होत्रा (पार्श्वगायन), डॉ. मकरंद जावडेकर (कॉर्पोरेट), डॉ. कमल टावरी (खादी और समग्र विकास), मनोरंजन व्यापारी (साहित्य), फरीद शेख (फोटोशूट और पुराने कैमरों का संग्रहण), डॉ. रेणू राज (कानून और न्याय व्यवस्था) को दिए जाएंगे.



## मिजोरम के राज्यपाल रहेंगे उपस्थित

इसके अलावा पद्मश्री सोमा घोष (भारतीय शास्त्रीय संगीत), डॉ. अर्णब भट्टाचार्य (शिक्षा और अनुसंधान), राजेश बत्रा (लोकसेवा), विमल बाफना (कॉर्पोरेट, सीएसआर), महेश नामपुरकर (निर्माणशास्त्र), नमिता कोहक (शौर्य), निशा मिश्रा (विश्व उत्पत्तिशास्त्र), गोपिका वर्मा (नृत्यकला-मोहिनीअट्टम एवं नृत्य विरासत का संवर्धन) को 'राष्ट्रीय पुरस्कार' तथा डॉ. विष्णू महाराज पारनेरकर को 'सूर्यरत्न आधुनिक युग के संत पुरस्कार' से सम्मानित किया जाएगा. सम्मान चिह्न, सम्मान पत्र ऐसा इस पुरस्कार का स्वरूप होता है. सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टियूट्स' के संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय चोरडिया ने पत्रकार वार्ता में इसकी घोषणा की. इस समय संस्था के सलाहकार सचिन इटकर, संचालक अक्षत कुशल, सिद्धांत चोरडिया, ऋचा जोशी आदि उपस्थित थे. डॉ. संजय चोरडिया ने कहा कि, 'सूर्यदत्ता एजुकेशन फाउंडेशन के स्थापना दिवस पर इन पुरस्कारों को प्रदान किया जाएगा. पुरस्कारों का यह 18वां वर्ष है. इन पुरस्कारों का वितरण 7 फरवरी 2020 को शाम 5.30 बजे बावधन स्थित सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स के कैम्पस में किया जाएगा.

इस समारोह में मिजोरम के राज्यपाल पी. एस. श्रीधरन पिल्लई प्रमुख अतिथि के तौर पर उपस्थित रहेंगे. कार्यक्रम की अध्यक्षता अहिंसा विश्व भारती के संस्थापक अध्यक्ष आचार्य डॉ. लोकेश मुनी होंगे. यूजीसी के उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन बीजभाषण करेंगे. दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स एण्ड इंडस्ट्रीज (डिक्की) के अध्यक्ष मिलिंद कांबले, वरिष्ठ अभिनेता रजा मुराद विशेष अतिथि के तौर पर उपस्थित रहेंगे. सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टियूट्स में आज विभिन्न पाठ्यक्रम चलाए जाते हैं.

Pune Edition
Jan 30, 2020 Page No. 5

पुढारी

# सूर्यदत्ता जीवनगौरव पुरस्कार जाहीर

## राज्यपालांच्या हस्ते ७ फेब्रुवारीला वितरण

**पुणे : पुढारी वृत्तसंस्था**

सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटतर्फे दिले जाणारे 'सूर्यदत्ता जीवनगौरव पुरस्कार' जाहीर करण्यात आले आहेत. लेफ्ट. जनरल (निवृत्त) डॉ. दत्तात्रय शेकटकर (राष्ट्रसेवा), डॉ. विकास आमटे (वैद्यकीय सामाजिक सेवा), लायन द्वारका जालान (साहित्य), टोनींनो लॅम्बोर्गिनी (आंतरराष्ट्रीय उद्योजकता), पद्मश्री सुधा मल्होत्रा (पार्श्वगायन), डॉ. मकरंद जावडेकर (कॉर्पोरेट), डॉ. कमल टावरी (खादी आणि समग्र विकास), मनोरंजन ब्यापारी (साहित्य), फरीद शेख (छायाचित्रण आणि पुरातन कॅमेर्यांचे संग्रहण), डॉ. रेणू राज (कायदा आणि न्यायव्यवस्था) यांना 'सुर्यदत्ता जीवनगौरव पुरस्कार' जाहीर झाला आहे.

तसेच डॉ. विष्णू महाराज पारनेरकरजी यांना 'सुर्यरत्न आधुनिक युगाचे संत पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात येणार आहे, अशी अशी माहिती सूर्यदत्ताचे अध्यक्ष डॉ. संजय चोरडिया यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी संस्थेचे सल्लागार सचिन इटकर, संचालक अक्षित कुशल, सिद्धांत चोरडिया, ऋचा जोशी आदी उपस्थित होते.

त्याचबरोबर पद्मश्री सोमा घोष (भारतीय शास्त्रीय संगीत), डॉ. अर्णब भट्टाचार्य (शिक्षण आणि संशोधन), राजेश बत्रा (लोकसेवा), विमल बाफना (कॉर्पोरेट, सीएसआर), महेश नामपूरकर (स्थापत्यशास्त्र आरेखन), नमिता कोहक (शौर्य), निशा मिश्रा (विश्व उत्पत्तिशास्त्र), गोपिका वर्मा (नृत्यकला-मोहिनीअट्टम व वारसा संवर्धन) यांना 'सुर्यदत्ता राष्ट्रीय पुरस्कार' जाहीर झाला आहे.

डॉ. चोरडिया म्हणाले, सुर्यदत्ता एज्युकेशन फाऊंडेशनच्या वर्धापन दिनानिमित्त हे पुरस्कार देण्यात येत असून, यंदा पुरस्कारांचे १८ वे वर्ष आहे. या पुरस्कारांचे वितरण शुक्रवार, दि. ७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५.०० वाजता बावधन येथील संस्थेच्या कॅम्पसमध्ये होईल. मिझोरामचे राज्यपाल पी. एस. श्रीधरन पिल्लई प्रमुख, अहिंसा विश्व भारतीचे संस्थापक अध्यक्ष आचार्य डॉ. लोकेश मुनीजी, युजीसीचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन, डिक्कीचे अध्यक्ष मिलिंद कांबळे, ज्येष्ठ अभिनेते रझा मुराद आदी उपस्थित राहणार आहेत.

नवराष्ट्र

# डॉ. शेकटकर, डॉ. आमटे यांना 'सूर्यदत्ता जीवनगौरव पुरस्कार' जाहीर

**पुणे :** सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे 'सूर्यदत्ता जीवनगौरव पुरस्कार' जाहीर करण्यात आले आहेत. निवृत्त लेफ्ट. जनरल डॉ. दत्तात्रय शेकटकर (राष्ट्रसेवा), डॉ. विकास आमटे (वैद्यकीय सामजसेवा), लायन द्वारका जालान (साहित्य), टोनींनो लॅम्बोर्गिनी (आंतरराष्ट्रीय उद्योजकता), पद्मश्री सुधा मल्होत्रा (पार्श्वगायन), डॉ. मकरंद जावडेकर (कॉर्पोरेट), डॉ. कमल टावरी (खादी आणि समग्र विकास), मनोरंजन व्यापारी (साहित्य), फरीद शेख (छायाचित्रण आणि पुरातन कॅमेरे संग्रहण), डॉ. रेणू राज (कायदा आणि न्याय) यांचा यात समावेश असल्याची माहिती इन्स्टिटयूटचे अध्यक्ष डॉ. संजय चोरडिया यांनी दिली.

Pune Plus Edition
Jan 30, 2020 Page No. 3